Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.III/April; 12pp.1-4 *श्रीमती शिंदे स्वाती भास्कर* **ISSN:-2230-7850**

**Research Papers**


# *ग्रामसभा तळागाळातील लोकशाहीचे खरे व्यासपीठ*

*प्रा. डॉ. जाधव बबन भिवसेन,*
शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये
कॉलेज कळंबोली

*श्रीमती शिंदे स्वाती भास्कर*
संशोधक विद्यार्थिनी

*प्रस्तावना :–*

***गोषवारा:***– तळागाळापर्यंत लोकशाही रूजवण्याची संकल्पना भारतात वैदिक काळापासून आहे. लोकशाही ग्रामपातळीपर्यंत पोहचविण्यासाठी ग्रामसभा सक्षम असणे आवश्यक आहे. ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाही व्यवस्थापनातील ग्रामस्तरावरील सर्वोच्च यंत्रणा आहे. भारताचा विकास खऱ्या अर्थाने होण्यासाठी ग्रामसभेपासून सुरूवात होणे आवश्यक आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 कलम 6 अनुसार ग्रामपंचायत क्षेत्रामधील सर्व पौढ व्यक्तींचा ग्रामसभेत समावेश होतो. 73व्या घटनादुरूस्तीनुसार ग्रामसभेला सांविधिनिक दर्जा प्राप्त झाला आहे. ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच असतो. ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी ग्रामसभा हे लोकशाहीचे खरे व्यासपीठ आहे.




ग्रामसभेमध्ये सर्व प्रौढांचा समावेश होत असल्याने त्यात अनुसूचित जाती, जमाती, स्त्रिया, इतर मागास घटक या सर्वांचा समावेश होतो.

***ग्रामसंभाचे आयोजन :*** ग्रामपंचायतींनी संपूर्ण वर्षात किमान सहा ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. सदर ग्रामसभा 26 जानेवारी, 1मार्च ते 8 मार्च (नागरी संरक्षण दिन ते महिला दिन), 24 एप्रिल ते 1 मे (पंचायत राज दिन ते महाराष्ट्र दिन),9 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट (क्रांती दिन ते स्वातंत्र्य दिन), 2 ऑक्टोंबर (म. गांधी जयंती), 19 नोव्हेंबर ते 26नोव्हेंबर (ग्रामस्थ दिन ते जागतिक महिला अन्याय निवारण दिन) या कालावधीत घेणे आवश्यक आहे. प्रत्येक ग्रामसभेपूर्वी महिला सभा घेणे कायद्याने आवश्यक आहे. ग्रामसभा व महिला सभांच्या अगोदर प्रत्येक वार्डात 'वार्डसभा'ही होणे ग्रामसभेच्या फायद्याचे आहे. ग्रुप ग्रामपंचायत असेल तर प्रत्येक वार्डात ग्रामसभा होणे बंधनकारक आहे.मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 मधील तरतुदींनुसार ग्रामसभेच्या बैठका बोलाविण्याची जबाबदारी सरपंच किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच यांच्यावर आहे. एखाद्या व्यक्तीस ग्रामसभेस हजर राहण्याचा हक्क आहे किंवा नाही असा वाद निर्माण झाल्यास बैठकीच्या अध्यक्षांचा निर्णय अखेरचा राहतो. साधारण सभेची सूचना सभेच्या तारखेच्या सात दिवस अगोदर द्यावी तर असाधारण सभेची सूचना चार दिवस अगोदर द्यावी. ग्रामसभेची गणसंख्या गावातील एकूण मतदारसंख्येच्या 15 टक्के किंवा किमान 100 व्यक्ती अशी असते. त्यामध्ये 1/3 हया महिला असतील. ग्रामसभेचा कामकाज तहकूब केल्यास त्याच वेळी पुढील सभेचा कार्यक्रम जाहीर केला जातो.

***ग्रामसभेतील विषय व कामकाज :***

महाराष्ट्र शासनाने 20 फेब्रुवारी 2008 रोजी ग्रामसभेमध्ये साधारणपणे कोणते विषय घेण्यात यावेत, याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. चालू आर्थिक वर्षातील ग्रामसभेच्या पहिल्या बैठकीत गतवर्षीच्या प्रशासकीय कार्याचा अहवाल तपासणे, वार्षिक हिशोब व लेखाशेरे तपासणे, पुढील वर्षाचा विकास कार्यक्रम व अंदाजपत्रक तपासणे, ग्रामस्थांनी सुचविलेल्या विषयांवर ठराव करून त्यांची नोंद करणे हे कार्य करावी लागतात. जिल्हा परिषदेची स्थायी समिती, पंचायत समिती, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तसेच राज्यशासनाने ग्रामसभेपुढे मांडावयास कळविलेले विषय ग्रामसभेपुढे मांडले जातात.

गावामध्ये शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या विकास कामांचा आढावा घेणे, व्यक्तिगत लाभार्थ्यांची निवड करणे, मागील ग्रामसभेमध्ये झालेल्या ठरावांच्या अंमलबजावणीसंदर्भात चर्चा करणे, गावाच्या गरजा लक्षात घेऊन

**Please cite this Article as :** *श्रीमती शिंदे स्वाती भास्कर,प्रा. डॉ. जाधव बबन भिवसेन*, *ग्रामसभा तळागाळातील लोकशाहीचे खरे व्यासपीठ* **:**
**Indian Streams Research Journal (April ; 2012)**

विकास कामांच्या आखणी संदर्भात विषय चर्चिले जातात. महाराष्ट्रात जलव्यवस्थापनाचे कार्य ग्रामसभेकडे आहे. सभेचे कामकाज विषयसूचीनुसार घेतले जाते. ग्रामस्थांचा सहभाग वाढवून त्यांच्या सर्व शंकाचे निरसन केले जाते. ग्रामसभेचे कामकाज नियोजित वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष दिले जाते.

***ग्रामसभेच्या कार्याचे मुल्यमापनः***

ग्रामसभा प्रभावी न होण्यामागील प्रभावी कारण म्हणजे लोकांची उदासीनता हे होय. त्याचबरोबर राजकीय इच्छाशक्तीचा अभाव हेही कारण आहे. ग्रामसभेचे महत्त्व लोकांना माहीत नाही. ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांची उपस्थिती राष्ट्रीय पातळीवर 40टक्के तर महाराष्ट्रात ती 50टक्के आहे. ग्रामसभेला गावातील सर्व प्रौढ स्त्री–पुरूषांनी हजर राहिले पाहिजे. अन्यथा ग्रामसभा तहकूब कराव्या लागतात. सिंधुदूर्ग जिल्ह्यात 319 ग्रामसभा तहकूब कराव्या लागल्या होत्या. हे प्रमाण कमी होणे आवश्यक आहे. एकदा ग्रामपंचायतीची निवडणूक झाल्यानंतर आपले काम संपले असेच मतदारांना वाटते. ग्रामसभेची सूचना, वेळ व ठिकाण लोकांस माहीत पडत नाही. स्त्रिया ग्रामसभेपासून अलिप्त रहातात. आपल्याला काय करायचे त्याचे असे त्यांना वाटते. ग्रामसभेला उपस्थित असलेले लोकही सरपंचाशी वाद नको अशी भूमिका घेतात. बऱ्याचशा ग्रामसभा कागदोपत्री होतात. काही ठिकाणी स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताकदिनी कार्यक्रमास आलेल्या लोकांच्या फक्त सहया घेतल्या जातात परंतु ग्रामसभेच्या विषय मुद्दयांची चर्चा केली जात नाही. अनेक ठिकाणी ग्रामसभा घेतल्या तरी दररोजच्या सभेप्रमाणे त्या घेतल्या जातात. त्यात कोणतेही गांभीर्य नसते. ग्रामसभेला भरपूर अधिकार असतात परंतु प्रत्यक्ष व्यवहारात ग्रामसभेचा प्रभाव ग्रामपंचायतीच्या कार्यावर दिसून येत नाही. म्हणूनच प्रा. पी. बी. पाटील समितीने पंचसभेची शिफारस केली होती. ग्रामसभा होत नसतील तर तहसीलदारांकडे तक्रार करता येते.

ग्रामसभेमार्फत गावाच्या विकास कामांचे नियोजन करता येते. ग्रामसभेच्या नियोजनातून विकास करण्यामध्ये आंध्रप्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र असा क्रम लागतो तर राष्ट्रीय पातळीवर हे प्रमाण 40टक्के आहे. ग्रामपंचायतीचे कार्य पारदर्शक होऊन विकास साधता येतो. गैरव्यवहाराला आळा बसू शकतो. दलित वस्ती सुधारणा, रोजगार हमी योजना, घरकुल योजना इ. योजना योग्य लाभार्थ्यांपर्यंत जाऊ शकतात. दारिद्र्या रेषेखालील लोकांची योग्य यादी होऊ शकते. सर्वागीण विकास, सामाजिक सुरक्षा, लिंग समानता, घटते लिंग गुणोत्तर, मद्यपान–धुम्रपान रोखणे, शेती विकास, दुष्काळ–महापूर व्यवस्थापन, जल व मृदा संवर्धन, शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करणे, बेरोजगारी समस्या, शिक्षण समस्या, आरोग्य समस्या अशा अनेक विषंयावर ग्रामसभेत चर्चा होऊन चांगले निर्णय घेतले जाऊ शकतात. कार्यक्षम ग्रामसभांमुळे खेडेगावाचा कायापालट होतो. उदा. अहमदनगर जिल्हयातील हिवरे बाजार, राळेगण सिद्धी हे सांगता येईल. कर्नाटक सरकारने पंचायत राज पध्दतीद्वारे जल संधारण आणि वीज व्यवस्थापन क्षेत्रात उत्तम कामगिरी केली आहे. उत्तरप्रदेशात मध्यान्ह भोजन योजना ग्रामपंचायतीद्वारे राबविली जाते. वायनाड जिल्हयात आदिवासी मुलांमधील शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्यात यश आले आहे. गावच्या समस्यांवर गावांतील लोक चांगल्या उपाययोजना सूचवू शकतात. त्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे. जनजागृतीचे हे प्रमाण भारतात 50टक्के तर महाराष्ट्रात 70टक्के आहे. अहमदनगरमध्ये राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा) व डी.आर.डी.ए. यांच्यावतीने ग्रामसभा बळकटीकरणासाठी जनजागृती रथ तयार केला होता. त्याद्वारे ग्रामसभांचे महत्व सांगण्यात आले. महाराष्ट्र शासनामार्फत ग्रामसभा क्रियाशील होण्यासाठी 'गौरव ग्रामसभा' स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामसभाद्वारे मानवी आणि वित्तीय स्त्रोतांचा पुरेपूर वापर करण्यात यशस्वी ठरत असल्याने त्या माध्यमातून सामाजिक आणि आर्थिक समानतेचे उदिद्ष्ट गाठणे सुलभ झाले आहे.

''भारत ग्रामीण भागात वास्तव्य करतो'' – महात्मा गांधी. भारत हा खेडयांचा देश आहे. लोकशाहीची फळे या खेडयातील शेवटच्या घटकांपर्यत जाण्यासाठी ग्रामसभा 'लोकशाहीचे व्यासपीठ' आहे. विकास कामात लोकसहभाग वाढविण्याच्यादृष्टीने ग्रामसभा अधिक उपयुक्त ठरू शकते. म्हणूनच जयप्रकाश नारायण यांनी म्हटले होते, " Gram sabha signifies village democracy. Let us not have representative government from the village to Delhi. One place at least there should be direct government".

***ग्रामसभा अधिक कार्यक्षम होण्यासाठी उपाययोजना :***

1. ग्रामसभे संदर्भात लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी ग्रामसभेच्या अधिकारांची माहिति भिंतीपत्रकांद्वारे, सूचना लिहून देण्यात यावी.
2. गावांत, शाळांमध्ये ग्रामसभेवर आधारित निबंध, घोशवाक्य इ. स्पर्धाचे आयोजन करावे.
3. वार्ड सभा, महिला सभा घेण्यात येऊन ग्रामसभेचे महत्व ग्रामस्थांना समजून द्यावे.
4. ग्रामसभेत झालेल्या निर्णयांना प्रसिद्धी द्यावी.
5. निरीक्षकांद्वारे ग्रामसभेची तपासणी करावी.
6. सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक यांना प्रभावी ग्रामसभा होण्यासाठी मार्गदर्शन करावे किंवा कार्यशाळा घ्याव्यात.
7. उत्कृष्ट ग्रामसभा घेणाऱ्या सरपंच व ग्रामसेवकांचा सत्कार करण्यात यावा. इ. उपाययोजना कराव्यात.
8. ग्रामसभेत संमत झालेल्या ठरावांची ग्रामपंचायतींनी दखल घ्यावी.
9. ग्राम पातळीवर पायाभूत सुविधांची गरज आहे.

प्राचीन काळात गणराज्ये स्वंयपूर्ण होती. त्या काळातील स्वंयपूर्णता व स्वायत्तता ती आजच्या पंचायतराज व्यवस्थेलाही अनुकरणीय आहे. ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असून ती ग्रामसभेला जबाबदार असते. केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने हे वर्ष 'ग्रामसभा वर्ष' म्हणून जाहीर केले आहे. तसेच महाराष्ट्र शासनानेही 2 ऑक्टोंबर 2009 ते 2 ऑक्टोंबर 2010 हे वर्ष 'ग्रामसभा वर्ष' म्हणून जाहीर केले होते. ग्रामपंचायत हा लोकशाही अर्थव्यवस्थेचा पाया आहे. त्यामुळेच ग्रामसभा सक्रिय असल्या पाहिजेत. भारत हा खेड्यांचा देश आहे. इ. स. 2002 मध्ये भारतात 2,65,000 ग्रामपंचायती होत्या. या खेड्यात अनेक लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगतात. त्यांचे विविध प्रश्न स्थानिक प्रशासनच ग्रामसभेच्यामार्फत लोकशाही मार्गाने सोडवू शकतात. भारतात विविधता असल्याने सर्वांना लोकशाही व्यवस्थेत सहभागी करून घेवून सर्वांचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. म्हणूनच महात्मा गांधी म्हटले होते, ''जर माझे स्वप्न पूर्ण झाले तर भारतामधील सात लाख गावांमध्ये प्रजातंत्र निर्माण होईल. त्यात प्रत्येकाला शिक्षण, काम, पौष्टिक अन्न, राहण्यासाठी हवेशीर घर आणि नेसण्यासाठी पुरेसे वस्त्र असेल''.

***संदर्भ व तळटीपा :***

1.http://mahanews.gov.in/content/articleshow.
2.डॉ. व्ही. जी. नान्देडकर, पंचायतीराज, के'सागर पब्लिकेशन, 2005, पृ. 78.
3.Social Audit (Gramsabha & Panchayati Raj) Final Report, Vision Foundation, For Development Management, Submit-Planning Commissioner, Government of India, Oct. 2005, p.62.
4.सकाळ, दि. 8 / 2 / 2010.

**Please cite this Article as :** ***श्रीमती शिंदे स्वाती भास्कर,प्रा. डॉ. जाधव बबन भिवसेन , ग्रामसभा तळागाळातील लोकशाहीचे खरे व्यासपीठ :*** **Indian Streams Research Journal (April ; 2012)**

5.Ibid, P.78.
6.डॉ. व्ही. जी. नान्देडकर, पंचायतीराज, के'सागर पब्लिकेशन, 2005, पृ.78.
7.लोकमत : मंथन, दि. 16 / 8 / 2009.
8.Social Audit (Gramsabha & Panchayati Raj) Final Report, Vision Foundation, For Development Management, Submit-Planning Commissioner, Government of India, Oct. 2005, p. 63.
9.मॅथ्यू सी. कुन्नुकल यांचा लेख, योजना, प्रकाशन विभाग भारत सरकार, फेब्रुवारी 2011, पृ.
10.Social Audit (Gramsabha & Panchayati Raj) Final Report, Vision Foundation, For Development Management, Submit-Planning Commissioner, Government of India, Oct. 2005, p. 63.
11. लोकसत्ता, दि. 18 / 10 / 2010.
12.http://mahanews.gov.in/content/articleshow.
13.पंचायतराज मूल्यमापन समिती – प्रा. पी. बी. पाटील अहवाल.
14.www.southasia.oneworld.net
15.http://mahanews.gov.in/content/articleshow
. Our Civic Life (Civics & Administration) Maharashtra State Bureau of Textbook Production & Curriculum Research, Pune.

**Please cite this Article as :** श्रीमती शिंदे स्वाती भास्कर,प्रा. डॉ. जाधव बबन भिवसेन, ग्रामसभा तळागाळातील लोकशाहीचे खरे व्यासपीठ : **Indian Streams Research Journal (April ; 2012)**